# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

# Maharashtra Electricity Regulatory Commission


निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/१४/२०१५/ 00262 दिनांक- २३.०७.२०१५

अपील क्र. मविनिआ/माअअ/अपील/१४/२०१५

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे:**

अपीलकर्ता

श्री विठ्ठलराव गायकवाड (सरचिटणीस),
बॉम्बे इलेक्ट्रिक वर्कर्स युनियन विभागीय कार्यालय
भारत कुंज बिल्डींग, २ रा मजला,
व्ही.एन. देसाई हॉस्पिटल जवळ,
दिनकर पटेल उद्यान समोर, ६ वा रस्ता,
सांताक्रुझ (पुर्व), मुंबई-५५.

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | : | ०५.०५.२०१४ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख | : | १९.०६.२०१५ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०३.०७.२०१५ |

**मागितलेली माहिती :**

१. सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ सालासाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर या मुंबई उपनगर वीज कंपनी व्यवस्थापनास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीज वितरण कार्यक्षमता प्रोत्साहन भत्ता म्हणुन दिलेल्या रकमेचा तपशिल मिळवा.
२. सन २०१३-२०१४ सालासाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने कामगारांच्या वेतन व सोयी-सवलतीसाठी कामगारांच्यासाठी केलेल्या खर्चाच्या रकमेचा आपणाला सादर केलेला तपशिल मिळावा.
३. सन २०१३-२०१४ सालामध्ये रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने अधिकाऱ्यांच्या वेतन व सोयी-सवलतीसाठी केलेल्या खर्च रकमेचा आपणाला सादर केलेला तपशिल मिळावा.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. मविनिआ/माअअ/६३/२०१५/२४५ दि.१९.०६.२०१५ नुसार अपिलार्थी यांना दिलेली माहिती येणे प्रमाणे -

उपरोक्त अर्जाच्या अनुषंगाने आपणांस आवश्यक असलेली माहिती पत्रासोबत जोडण्यात येत आहे. व माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगातील केस क्र. ९/२०१३ च्या आदेशातील पान क्र.१२९ ते पान क्र. १३८ ही जोडलेली आहेत.


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण-**

१) सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ सालासाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर या मुंबई उपनगर कंपनी व्यवस्थापनास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीज वितरण कार्यक्षमता प्रोत्साहन भत्ता म्हणुन दिलेल्या रकमेचा तपशिल दिला नाही. म्हणुन अपिल करीत आहे.
२) सन २०१३-२०१४ सालामध्ये रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने अधिकाऱ्यांच्या वेतन व सोयी सवलतीसाठी केलेल्या खर्च रकमेचा आपणाला सादर केलेला तपशिल दिला नाही. म्हणून अपिल करीत आहे.

**आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत)-**

मागितलेली माहिती वरिल नमूद केलेल्या कारणांकरिता अपीलकर्ता यांनी अपील दाखल केले आहे.

संबंधित अर्जावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. २२.०७.२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी आपले निवेदन सादर केले. अपिलार्थी सुनावणीस गैरहजर.

अपिलावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अपिलार्थी यांना दि. १९.०६.२०१५ रोजी माहिती अधिकारी यांनी या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविलेली आहे. माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगातील केस क्र. ९/२०१३ च्या आदेशातील पान क्र.१२९ ते पान क्र. १३८ ही जोडलेली आहेत, ज्यामध्ये अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अधिकाराच्या अंतर्गत मागितलेल्या मुद्दा क्र. १ ते ३ शी संबंधीत आहेत. व अपिलार्थी यांना माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. करीता सदरहू अपिलातील दोन्ही मुदयांवरती अपिल निकाली काढण्यात येत आहे.

जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(अनिलकुमार उके)**
**उपसंचालक (विधी) तथा**
**प्रथम अपीलीय अधिकारी.**

प्रत- जनमाहिती अधिकारी, मविनिआ, यांना माहितीसाठी.